# स्वच्छ भारत मिशन ग्रामीण
# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन
# जिल्हा परिषद, कोल्हापूर

## अभिनव उपक्रम

# कापडी पिशवी वाटप उपक्रम

स्वच्छता ही सेवा 2024 अंतर्गत, विविध उपक्रम राबविणेत आले यामध्ये, प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकयन एस. यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हयात 1 लाख कापडी पिशवी वाटप करणेचा अभिनव उपक्रम राबविणेत आला. दि. 2 ऑक्टोंबर 2024 रोजी ग्रामपंचायतींमध्ये कुटुंबांना कापडी पिशवी वाटप करणेत आले.

खालील प्रमाणे तालुक्यांना कापडी पिशवी वाटपाचे उद्दीष्ट दिले होते यानुसार ग्रामपंचायत स्तरावर कापडी पिशवी वाटप उपक्रम घेणेत आला.

| तालुका | कापडी पिशवी वाटप उद्दीष्ट | तालुका | कापडी पिशवी वाटप उद्दीष्ट |
|---|---:|---|---:|
| आजरा | 4535 | कागल | 8217 |
| भुदरगड | 6445 | करवीर | 15619 |
| चंदगड | 7035 | पन्हाळा | 9588 |
| गडहिंग्लज | 8475 | राधानगरी | 7592 |
| गंगनबावडा | 1446 | शाहुवाडी | 6417 |
| हातकणंगले | 15596 | शिरोळ | 9035 |


ग्रामपंचायत झुलपेवाडी. ता.आजरा


ग्राम पंचायत शिंदेवाडी
Latitude: 16.202888
Longitude: 74.400996
Elevation: 663.14±16 m
Accuracy: 13.4 m
Time: 10-02-2024 15:09
Note: ग्रामपंचायत शिंदेवाडी
Powered by NoteCam


कसबा उत्तूर ता.आजरा जि.कोल्हापूर
आपले सरकार सेवा केंद्र
स्वच्छ भारत अभियान
Latitude: 16.240483
Longitude: 74.261045
Elevation: 389.28±3 m
Accuracy: 13.1 m
Time: 02-10-2024 09:47
Note: स्वच्छता अभियान
Powered by NoteCam


सरपंच, उपसरपंच
कक्ष
ग्रामपंचायत सरवडे
ता. राधानगरी

पुण्यनगरी

# जिल्ह्यात १ लाख कापडी पिशव्या देणार

## जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. : 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत विविध उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार, स्वच्छता ही सेवा या मोहिमेंतर्गत २ ऑक्टोबरपर्यंत स्वच्छतेचे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. या पंधरवड्यात शासनाने दिलेल्या उपक्रमाबरोबरच पर्यावरणपूरक व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील १ लाख कुटुंबांना कापडी पिशवी वाटप करणे, प्लास्टिक ब्रिक्स तयार करणे आणि टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे हे विशेष उपक्रम ग्रामपंचायत स्तरावर राबवण्यात येणार आहेत, अशी माहिती प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



कार्तिकेयन एस. म्हणाले, स्वच्छता ही सेवा अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर कचरा साचलेली ठिकाणे निश्चित करून सार्वजनिक ठिकाणी श्रमदान करणे, लोकसहभाग आणि जनजागृतीपर विविध उपक्रम राबवणे, या उपक्रमांसह जिल्हा परिषदेमार्फत तीन विशेष उपक्रम राबवले जाणार आहेत. यामध्ये ग्रामीण भागातील कुटुंबांना ग्रामपंचायती मार्फत १ लाख कापडी पिशवी वाटप करण्यात येणार आहेत. प्लास्टिक पिशवीला पर्याय, कापडी पिशवीच्या जनजागृतीसाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. ग्रामपंचायत निधी, सीएसआरमधून कापडी पिशवी घेण्यात येणार आहेत. या पिशवी वर स्वच्छता ही सेवा २०२४ चे बोधचिन्ह व ग्रामपंचायतीचे नाव प्रिंट करण्यात येणार आहे.

ते म्हणाले, प्लास्टिकच्या

**कापडी पिशवीसाठी उद्दिष्ट**

आजरा- ४५३५
कागल- ८२१७
भुदरगड- ६४४५
करवीर- १५६१९
चंदगड- ७०३५
पन्हाळा- ९५८८
गडहिंग्लज- ८४७५
राधानगरी- ७५९२
गगनबावडा- १४४६
शाहूवाडी- ६४१७
हातकणंगले- १५५९६
शिरोळ - ९०३५

बाटलीमध्ये अधिकाधिक प्लास्टिक कचरा भरणे. यापासून प्लास्टिक वीट तयार करण्यात येणार आहे. या सर्वांबाबत तालुकास्तरावर स्पर्धा घेण्यात येणार आहेत. टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे तथा वेस्ट टू आर्ट हा उपक्रम सर्व शाळांमध्ये राबवण्यात येणार आहे. वापरत नसलेल्या वस्तूंचा पुनर्वापर करून विद्यार्थ्यांकडून नावीन्यपूर्ण कल्पनेतून टिकाऊ वस्तूची निर्मिती करण्यात येणार आहे. यामध्ये उत्कृष्ट आणि नावीन्यपूर्ण असलेल्या प्रत्येक तालुक्यातील पाच वस्तू जिल्हा स्तरावर सादर केल्या जाणार आहेत.

Kolhapur Edition
Sep 21, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

लोकमत

# ग्रामपंचायतींतर्फे एक लाख कापडी पिशव्यांचे होणार वाटप

## कार्तिकेयन एस. यांची माहिती : जिल्ह्यात 'स्वच्छता ही सेवा' मोहीम राबविण्यास सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पर्यावरण विषयक जनजागरण आणि स्वच्छतेचे महत्व सांगण्यासाठी जिल्ह्यात ' स्वच्छता ही सेवा ' मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील १०२५ ग्रामपंचायतींच्या वतीने १ लाख कापडी पिशव्यांचे वाटप करणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिली. तसेच प्लास्टिक ब्रिक्स तयार करणे आणि टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार करणे उपक्रम देखील राबविण्यात येणार आहेत.

ग्रामपंचायत स्तरावर कचरा साचलेली ठिकाणे निश्चित करून सार्वजनिक ठिकाणी श्रमदान करणे, लोकसहभाग आणि जनजागृतीपर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

**तालुका निहाय उद्दिष्ट**






- ग्रामपंचायत स्तरावर कचरा साचलेली ठिकाणे निश्चित करून सार्वजनिक ठिकाणी श्रमदान करणे असे उपक्रम राबविले जाणार आहेत.

**'वेस्ट टू आर्ट'**

- टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करण्यासाठी 'वेस्ट टू आर्ट' हा उपक्रम सर्व शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे.
- वापरत नसलेल्या वस्तूंचा पुनर्वापर करून विद्यार्थ्यांनी आपल्या नावीन्यपूर्ण कल्पनेतून टिकाऊ वस्तूची निर्मिती करावयाची आहे.
- प्रत्येक तालुक्यातील पाच उत्कृष्ट वस्तू जिल्हा पातळीवरील प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत.

राबविणार आहे. प्लास्टिक पिशवीला पर्याय, कापडी पिशवीच्या जनजागृतीसाठी वाटण्यात येणाऱ्या कापडी पिशव्यांवर ' स्वच्छता ही सेवा

नाव छापणार आहे. प्लास्टिक बाटल्यांमध्ये अधिकाधिक लहान प्लास्टिक पिशव्या, रॅपर भरून त्याच्या विटा तयार करण्यात येणार आहे.

घेण्यात येणार आहे. झाडाभोवती कट्टा करणे, सजावटीची भिंत तयार करणे असे उपक्रम घेणार असून याबाबत मूल्यांकन करून तालुक्यातून तिघांना

Hello Kolhapur
Page No. 6 Sep 21, 2024
Powered by: erelego.com

# प्लास्टीक ब्रिक्स- (विट) उपक्रम

प्लास्टीक कचरा आणि प्लास्टीकचा पुर्नवापर बाबत विद्यार्थ्यांना माहीती होणेसाठी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सुचनेनुसार आणि मार्गदर्शनाखाली प्लास्टीक ब्रिक्स हा अभिनव उपक्रम जिल्हयातील शाळांमध्ये राबविणेत आला.

- **विद्यार्थीनी आपल्या घरातील आणि आजुबाजुच्या परिसरातील प्लास्टीक कचरा ( पिशवी, रॅपर, प्लास्टीक तुकडे ) रिकाम्या प्लास्टीक बाटली मध्ये जास्तीत जास्त दाबुन भरुन प्लास्टीक ब्रिक्स – ( विट ) शाळेत जमा करणेची सुचना देणेत आली.**
- **या उपक्रमात जिल्हयातील 1975 शाळांपैकी, 1141 शाळांनी सहभाग नोंदविला आहे.**
- **या उपक्रमात 4800 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. यामध्ये विधार्थ्यांनी एकूण 3560 प्लास्टीक ब्रिक्स ( वीट ) तयार केले आहेत.**


श्री. लाल बहादूर शास्त्री विद्यालय व
ज्युनि. कॉलेज वाघवे
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
आपले सहर्ष स्वागत करीत आहे..
शालेय पोषण
सावधान




vivo V17
48MP AI Quad Camera


Shot on Y83 Pro
vivo dual camera
2024.09.28 10:03

सकाळ

# टाकाऊ प्लास्टिकपासून वीटनिर्मिती

## जिल्हा परिषदेतर्फे शाळांत 'वेस्ट टु आर्ट' उपक्रम

■ कुंडलिक पाटील :
सकाळ वृत्तसेवा

कुडित्रे, ता. २८ : जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागाने प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कंबर कसली आहे. जिल्हा परिषदेचे शाळेत टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, वेस्ट टु आर्ट उपक्रम सर्व शाळांमध्ये राबविण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये प्लास्टिक व प्लास्टिकच्या बाटलीपासून प्लास्टिकच्या ब्रिक्स तयार करण्यात येतील.

**■ स्पर्धा घेण्यात येणार....**

याबाबत विविध वस्तूंचे मूल्यांकन निकष निश्चित करून तालुका गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहेत. १० ऑक्टोबरनंतर मूल्यांकन होऊन प्रतितालुका तीन उत्कृष्ट क्रमांक जिल्हास्तरावर सादर करण्यात येणार आहेत. उत्कृष्ट विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

> "प्लास्टिक एकत्र करून यातून प्लास्टिक ब्रिक्स तयार करता येणार आहे. विद्यार्थ्यांना प्लास्टिक संकलन करण्याची व पुनर्वापर करण्याची सवय लागेल. नावीन्यपूर्ण वस्तू व विद्यार्थ्यांना गौरविण्यात येणार आहे.
>
> **- माधुरी परीट**, जिल्हा समन्वयक.

### टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू....

■ वेस्ट टू आर्ट उपक्रम सर्व शाळांमध्ये राबविण्यात येईल. वापरत नसलेल्या वस्तूंचा पुनर्वापर करून विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण कल्पनातून टिकाऊ वस्तूंची निर्मिती करण्यात येणार आहे. यामध्ये उत्कृष्ट आणि नावीन्यपूर्ण असलेल्या प्रत्येक तालुक्यातील पाच वस्तू जिल्हास्तरावर सादर केल्या जाणार आहेत. यामध्ये वस्तूवर विद्यार्थ्यांचे नाव, शाळेचे नाव नोंद करून या वस्तू जिल्हास्तरावर कार्यालयात प्रदर्शनासाठी ठेवण्यात येतील.



कुडित्रे : राष्ट्रसेवा प्रशाला, शिरोली केंद्र नागाव येथे रिकाम्या बाटल्यांपासून झाडाभोवती तयार केलेला पारकट्टा.

### प्लास्टिक ब्रिक्स तयार करणे

■ प्लास्टिकच्या बाटलीमध्ये अधिकाधिक प्लास्टिक कचरा भरून (प्लास्टिक पिशवी, रॅपर, लहान आकाराचे प्लास्टिक) यापासून प्लास्टिक वीट तयार करण्यात येणार आहे. यासाठी शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात येणार असून, यामुळे विद्यार्थ्यांना प्लास्टिकबाबत अधिक माहिती मिळेल.

### सजावटीसाठी वापर...

■ प्लास्टिक बाटल्यांचा सजावटीसाठी शालेय परिसरात वापर केला जाणार आहे. यामध्ये झाडासभोवताली कट्टा करणे, सजावटीची भिंत तयार करणे असे उपक्रम राबवले जातील.

Kolhapur, Kolhapur-Today
29/09/2024 Page No. 7

# टाकाऊ पासुन टिकाऊ वस्तु तयार करणे उपक्रम


वापरात नसलेल्या टाकाऊ वस्तुंचा पुर्नवापर या बाबत विद्यार्थ्यांना माहीती होणेसाठी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सुचनेनुसार आणि मार्गदर्शनाखाली टाकाऊ पासुन टिकावु वस्तु तयार करणे (वेस्ट टु आर्ट ) हा अभिनव उपक्रम जिल्हयातील सर्व शाळांमध्ये राबविणेत आला.

- वापरात नसलेल्या टाकाऊ वस्तु पासुन टिकाऊ वस्तु तयार करणे हा उपक्रम राबविणेत आला .
- या उपक्रमात प्रत्येक तालुक्यातील 5 नाविन्य पुर्ण वस्तुंचे जिल्हा स्तरावर प्रदर्शन भरविणेत आले.


वार- गुरुवार दि.२६।९।२०२४ प्राथमिक वि.मं. वझरे
ता. आजरा
'स्वच्छता हीच सेवा'
विषय- टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ (उपयुक्त) वस्तू
तयार करणे.' ('सुशोभित वस्तू बनविणे')
शाळा- प्राथमिक वि.मं. वझरे. ता. आजरा




VAIBHAVI



# टाकाऊ पासुन टिकावु वस्तु चे जिल्हा स्तरावर प्रदर्शन








**जिल्हा स्तरावर भरविणेत आलेल्या मिनी सरस या स्वयंसहाय्यता समुहांच्या उन्पादन्नांचे विक्री प्रदर्शनामध्ये दिनांक 6 जानेवारी ते दिनांक 10 जानेवारी 2025 या कालावधीत टाकाऊ पासुन टिकावु वस्तुंचे प्रदर्शन भरविणेत आले .**

पुण्य नगरी

# टाकाऊपासून टिकाऊ वस्तू ठरल्या 'सरस'

## जिल्हा परिषदेच्या प्रदर्शनातील स्टॉल लक्षवेधी; विद्यार्थ्यांनी बनवल्या आकर्षक वस्तू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२४ अंतर्गत दि. १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छतेचे विविध उपक्रम राबवण्यात आले होते. याबरोबर प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकियन एस. यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सर्व शाळांमध्ये टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तूंची निर्मिती (वेस्ट टू आर्ट) हा विशेष उपक्रम राबवला. या वस्तूंचा स्टॉल मिनी सरस प्रदर्शनामध्ये लक्षवेधी ठरला.



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्यामार्फत जिल्हा स्तरावर दि. ६ ते १० जानेवारी या कालावधीत मिनी सरस हे स्वयंसहायता समूहांच्या उत्पादनांचे विक्री प्रदर्शन भरवण्यात आले. यामध्ये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष विभागाचा स्टॉल उभारण्यात आला आहे. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी बनवलेल्या टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ उत्कृष्ट वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले. विद्यार्थ्यांनी घरातील व परिसरातील टाकाऊ वस्तूंपासून विविध प्रकारच्या टिकाऊ वस्तू बनवल्या आहेत. यामध्ये प्लास्टिक बाटलीपासून विविध प्रकारच्या फुलदाण्या, पेन स्टँड, तुळस कट्टा, झुंबर, ब्रिक्स स्टूल बनवले आहे. कागद व पुठ्ठ्यापासून श्री राम मंदिर कलाकृती, बैलगाडी, जहाज, ग्रामीण महिलांची बाहुली, टेबलवरील शोकेस, आकाशकंदील, झुंबर, दाराचे तोरण, भिंतीवरील शो पिस, नारळापासून तयार केलेले तबला, घर, पाण्याचा जार, बास्केट, अंड्यांच्या कवचापासून बनवलेले वांगे, लोखंडी डब्यापासून बनवलेले पक्ष्यांसाठी घरटे या आकर्षक वस्तूंचा समावेश आहे. विविध प्रकारच्या वस्तू पाहून नागरिक विद्यार्थ्यांचे कौतुक करत आहेत.

हा उपक्रम प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला असून, या उपक्रमाचे सनियंत्रण जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष व शिक्षण विभाग यांनी केले.

Kolhapur Edition
Jan 11, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

# 'टाकाऊ ते टिकाऊ' स्टॉल लक्षवेधी

- विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तू ठरल्या आकर्षण
- जि.प.तील सरस प्रदर्शनाचा समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानअंतर्गत ६ ते १० जानेवारी २०२५ या कालावधीत जिल्हा परिषदेत भरविण्यात आलेल्या मिनी सरस या स्वयंसहाय्यता समुहांच्या उत्पादनांच्या विक्री प्रदर्शनामध्ये 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांनी बनविलेल्या टाकाऊ वस्तुपासून टिकाऊ वस्तूंचा स्टॉल लक्षवेधी ठरला.

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२४ अंतर्गत १५ सप्टेंबर २०२४ ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छतेचे विविध उपक्रम राबविण्यात आले होते. या उपक्रमांबरोबर सीईओ कार्तिकियन. एस. यांनी शालेय विद्यार्थांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी, वापरात नसलेल्या टाकाऊ वस्तूंपासून, विद्यार्थांनी नाविण्यपूर्ण कल्पकतेतून टिकाऊ वस्तुंची निर्मिती करावी या उद्देशाने



**कोल्हापूर : जि. प. तील सरस प्रदर्शनामधील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तुंचा स्टॉल.**

जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तुंची निर्मिती (वेस्ट टु आर्ट) हा विशेष उपक्रम जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये राबविणेत आला. या उपक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यातील उत्कृष्ट ५ वस्तूंचे जिल्हा स्तरावर कार्यालयामध्ये प्रदर्शनासाठी ठेवण्याचे नियोजित केले होते.

यामध्ये विद्यार्थ्यांनी घरातील व परिसरातील टाकाऊ वस्तूंपासून विविध प्रकारच्या टिकाऊ वस्तु तयार केल्या आहेत. यामध्ये प्लास्टिक बाटलीपासून विविध प्रकारच्या फुलदानी, पेन स्टॅन्ड, तुळस कट्टा, झुंबर, ब्रिक्स स्टुल बनविले आहे. कागद व पुठ्यापासून राम मंदिर कलाकृती, बैलगाडी, जहाज, ग्रामीण महिलांची बाहुली, टेबल वरील शोकेस, आकाश कंदील, झुंबर, दाराचे तोरण, भिंतीवरील शोपिस, नाराळापासून तयार केलेला तबला, घर, पाण्याचा जार, बास्केट, अंड्यांच्या कवचीपासून बनविलेले वांगे, लोखंडी डब्यापासून बनविलेले पक्षांसाठी घरटे या आकर्षक वस्तुंचा समावेश आहे. स्टॉलमधील विविध प्रकारच्या वस्तू पाहून नागरिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उपक्रमाचे सनियंत्रण जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष व शिक्षण विभागाने केले.

महासत्ता एकच आवृत्ती



## जिल्हास्तरावरील सरस प्रदर्शनात

# टाकाऊ वस्तुपासून टिकावू वस्तूंचा स्टॉल ठरला लक्षवेधी

**कोल्हापूर, ता.१० (प्रतिनिधी) –**

**जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तुपासुन टिकावू वस्तूंची निर्मिती केली.या वस्तूचा स्टॉल जिल्हास्तरीय सरस प्रदर्शनात मांडण्यात आला होता, मात्र हा स्टॉल प्रदर्शनात सर्वासाठी लक्षवेधी ठरला.**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन. एस., यांच्या संकल्पनेतून शालेय विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी, वापरात नसलेल्या टाकावू वस्तुपासून, विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण कल्पकतेतून टिकावू वस्तूंची निर्मिती करावी या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये टाकाऊ वस्तूपासुन टिकावू वस्तुंची निर्मिती (वेस्ट टु आर्ट ) हा विशेष उपक्रम सर्व शाळांमध्ये राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यातील उत्कृष्ट ५ वस्तूंचे स्टॉल जिल्हास्तरावरील प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. या उपक्रमाची माहिती घेण्यासाठी तसेच वस्तूंच्या खरेदीसाठी गर्दी झाली होती. विद्यार्थ्यांनी घरातील व परिसरातील टाकावू वस्तुपासून विविध प्रकारच्या टिकावू वस्तु बनविल्या आहेत. यामध्ये प्लास्टीक बाटली पासून विविध प्रकारच्या फुलदानी, पेन स्टॅन्ड, तुळस कट्टा, झुंबर, ब्रिक्स स्टुल बनविले. कागद व पुठ्यापासून श्री राम मंदिर कलाकृती, बैलगाडी, जहाज, ग्रामीण महिलांची बाहुली, टेबल वरील शोकेस, आकाश कंदील, झुंबर, दाराचे तोरण, भिंतीवरील शोपिस, नाराळापासून तयार केलेले तबला, घर, पाण्याचा जार, बास्केट, अंड्याच्या कवचापासून बनविलेले वांगे, लोखंडी डब्यापासून बनविलेले पक्षांसाठी घरटे या आकर्षक वस्तूंचा समावेश आहे.

# Thanks